# गाय , देव आणि गुराखी

मित्रांनो दचकलात ना ? ह्या ३ गोष्टींचा काय संबंध असा विचार मनात आला की नाही ? असो . तुम्हाला जास्त बुचकळयात टाकत नाही .

दिवाळीचा पहिला दिवस होता . मी अर्थातच नेहमीप्रमाणे भल्या पहाटे फिरून घरी परतत होतो . परंतु चालण्याची गति कमी करावी लागली कारण रस्त्यावरून माझ्यापुढे ५ गायी चालल्या होत्या . बाजूने वाहने जात असल्यामुळे चटकन पुढेही जाता येत नव्हते . आम्ही सर्वच जण गुराखी झालो होतो . दोन दोन गायींच्या गळयात एकच दोरी बांधलेली होती . ४ गाई वयाने जरा तरूण होत्या . त्या गायी नियमानुसार सरळ चालत नव्हत्या . डावीकडील २ गाई कधी आणखिन डावीकडे जात होत्या . तसेच उजवीकडील गायीही कधी आणखिन डावीकडे तर कधी रस्ता ओलांडायचा प्रयत्न करत होत्या . वाहनचालकांची पण तारांबळ उडत होती . पाचवी गाय सर्वांच्या मागे पाय ओढीत चालत होती . ही गाय म्हातारी होती . सर्व हाडे दिसत होती . गुराखी ह्याच गाईची शेपूट हातात धरून काठीने सारखे त्या गाईच्या पाठीवर मारत होता . ती गाय बिचारी मार खात होती पण जलद धावणे तीला शक्य होत नव्हते . ( कदाचित गुडघे दुखत असतील . )

तेवढयात एक माणूस सायकलवरून आला व त्या गुराख्याशी भांडल्या सारखा बोलू लागला . प्रथम वाटले कि त्याला पुढे जाण्यास अडथळा आल्यामुळे तो चिडला असेल . पण थोडयाच वेळात खरा प्रकार लक्षात आला . त्या गुराख्याला गाई नेण्यास उशीर झाला होता . त्यामुळेच तो इसम चिडला होता . मग तो सायकलस्वार तरूण गाईंना हाकू लागला . स्लो सायकलींग करत गाईंच्या पायात सायकलचे चाक घुसवत होता , गाईंना धपाटे मारत होता , तोंडाने आवाज करून घाबरवत होता . तरी त्या तरूण गाई स्वतःच्या मस्तीतच चालत होत्या .

ब-याच वेळाने मला त्या सायकलस्वाराबरोबर चालण्याची संधी मिळाली . मी न राहवून त्याला विचारले की गाईंना कोठे एवढया पहाटे घाईने घेऊन जाताय ? त्याच्या उत्तराने मला आश्चर्यच वाटले . गाईंना वेगवेगळया देवळांच्या बाहेर बांधण्यासाठी ( थोडक्यात म्हणजे रोजंदारीला लावण्यासाठी ) तो नेत होता . खरेतर दिवाळीचा दिवस असल्यामुळे ह्या कामाला उशीरच झाला होता . म्हणूनच तो गुरख्यावर चिडत होता कारण गुराखी मोबाईल कॉलला उत्तर देत नव्हता . असो .

माझी विचारधारा आता सुरू झाली . माणूस किती स्वार्थी आहे नाही ? भारतात गाईला देव मानतात कारण आपल्याला दुध मिळते , शेतीसाठी बैल मिळतात वगैरे . काही देशात गाईचे मांस आवडीने खाल्ले जाते ही त्याची दुसरी बाजू . गाईच्या पोटात ३३ कोटी देव आहेत अशी धार्मिक लोकांची समजूत आहे . ज्या गाईला देवळाच्या बाहेर बांधल्यानंतर देवत्वाचा दर्जा मिळतो त्याच गाईला देवळापर्यंत पोचताना मार खावा लागत होता . एक माणूस गाईकडे श्र्द्धेने बघत होता तर गुराख्यासाठी पैसे मिळविण्याचे ते एक साधन होते . म्हातारी गाय भराभर चालू शकत नव्हती हे कळून सुध्दा तो गुराखी गाईला काठीने मारत होता . त्या गाईचे उपयुक्त आयुष्य खरे तर संपले होते . पण गुराखी म्हाता-या गाईला सुध्दा कामाला लावत होता .

ह्या विचारांनी मला खूपच वाईट वाटले . दिवाळीच्या पहाटे भलतेच विदारक सत्य समोर उभे टाकले . आजपर्यंत देवळाच्या बाहेर उभ्या असलेल्या गाईला बघितले आहे , कधीतरी चाराही घातला आहे पण गाईच्या आयुष्यातही माणसा सारखीच धावपळ असेल असे कधी वाटले नव्हते .

विचार करता करता मला त्या म्हाता-या गाईच्या ऐवजी वृद्ध मंडळी दिसू लागली . तरूणपिढी जरी त्यांचा पुरेसा आदर करत नसली तरी त्यांचा पुरेपुर उपयोग कसा करून घेता येईल हे मात्र पहात असते . म्हणूनच घरच्या जबाबदा-या म्हाता-या मंडळींवर टाकून तरूणपिढी नोकरी , व्यवसायाला बाहेर पडत असते . घरात कितीही मदत केली तर कौतुकाचा शब्द कानी पडेलच ह्याची खात्री नाही . नातवंडांनी खोटया नाटया तक्रारी आई बाबाला सांगीतल्या नाहीत म्हणजे झाले .

गाय तर बोलून चालून मुके जनावर. गुराखाच्या / मालकाच्या हातातील बाहुले. पण म्हातारी माणसे बरेच वेळा ही परिस्थिती स्वतःच ओढवून घेतात. आयुष्यातील मिळकत मुलाबाळांना आधीच देऊन टाकतात, बोलण्यात, विचारात पुरेशी पारदर्शकता ठेवत नाही, म्हातारपणच्या चिंतेने स्वतःचे तरूणपण नासवतात, मुलांना दुखवत नाहीत तर आपल्या म्हातारपणची काठी म्हणून त्याला लहानपणापासूनच सहन करतात. ह्या सर्वांची त्या मुलाला कल्पना नसते. लग्न झाल्यावर स्वतःच्या आईवडिलांपेक्षा बायकोचे पपा – ममी जास्त जवळचे वाटायला लागतात. विचार कराल ?

असो. कोळसा जेवढा उगाळावा तेव्हढा काळाच.